**प्रेस नोट** **दि १७/०३/२०१९**

**कोथरुड पोलीस स्टेशन पुणे शहर**

**नॉन बेलेबल मधील आरोपीस अटक केलेबाबत**

मा.जिल्हा व सत्र न्यायालय यांच्याकडील नॉन बेलेबल वॉरंट क्रमांक एससीसी १२४/२०१३ मधील आरोपी सांगर सदाशिव काळोखे,रा.सुवर्णनगरी डावी भुसारी कॉलनी,कोथरुड,पुणे हा कोथरुड पोलीस स्टेशनकडील शरीराविरुध्द गुन्हे करणारा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याच्याविरुध्द असलेल्या गुन्हयाचे सुनावणीकामी सदरचा आरोपी ब-याच दिवस मिळुन येत नव्हता व न्यायालयात हजर राहत नसल्याने न्यायालयाने नॉन बेलेबल वॉरंट जारी केले होते सदर आरोपीचा तपास प्रतिभा जोशी वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोथरुड पो स्टे पुणे शहर व शंकर खटके पोलीस निरीक्षक गुन्हे कोथरुड पो स्टे पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली कोथरुड पोलीस स्टेशनकडील तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक,एस बी.पाटील व सर्व्हेलन्सचे काम पाहणारे पो हवा माने व इतर स्टाफ यांनी आरोपीचा शोध घेवुन सदर आरोपीस दि.१५/०३/२०१९ रोजी अटक करुन मा.न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने आरोपीस जामिन न देता त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे.

(प्रतिभा जोशी)<br>
वरिष्ठ पोलीस निरीक्षक<br>
कोथरूड पोलीस ठाणे पुणे